# जाहिरात

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प, गडचिरोली यांचे कार्यालय अंतर्गतअंगणवाडी मदतनिस भरती प्रक्रीया सन 2023-2024 साठी नगर परिषद / नगर पंचायत गडचिरोली,भामरागड,वडसा देसाईगंज,धानोरा, मुलचेरा, भामरागड, अहेरी शहरातील अंगणवाडी मदतनिस रिक्त पदांसाठी अनुक्रमे रु.4425/- प्रति महिना असे एकत्रित मानधनी तत्वावर निवडीसाठी सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी नगर परिषद / नगर पंचायत गडचिरोली,भामरागड,वडसा देसाईगंज,धानोरा, मुलचेरा, भामरागड, अहेरी शहरातील पात्र महिला उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीनुसार विहित नमुन्यांत अर्ज मागविण्यांत येत आहे.

**अटी व शर्ती** :-

1. **शैक्षणिक पात्रता** :- अंगणवाडी मदतनिस पदांसाठी अर्जदार **किमान** 12 **वी उत्तीर्ण असणे** आवश्यक आहे. इयत्ता 12 वीचे गुणपत्रकाची सत्यप्रत आवश्यक असून सदरील गुणपत्रक नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. यापेक्षा उच्चतम शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवाराने आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या व गुणपत्रिकांच्या सत्यप्रती सादर कराव्यात.
2. **वास्तव्याची अट** :- उमेदवार महिला स्थानिक रहिवाशी असावी.स्थानिक रहिवाशी म्हणजेच ज्या शहरातील अंगणवाडी मदतनिस पदासाठी अर्ज केलेला असेल त्याच शहरातील रहिवाशी महिला अर्जदार असणे आवश्यक आहे. यासाठी रहिवाशी दाखला म्हणून शासकीय दस्ताऐवज (जसे : आधार कार्ड/मतदान ओळखपत्र इत्यादी) जोडण आवश्यक आहे.
3. **वयाची अट** :- अंगणवाडी मदतनिस या पदासाठी वयोमर्यादा किमान 18 वर्षे व कमाल 35 वर्षे राहिल. तसेच विधवा उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 40 वर्षे राहिल .त्याकरीता शाळा सोडल्याचा दाखला किंवा 10 वी उत्तीर्ण बोर्डाचे प्रमाणपत्र किंवा जन्म दाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहिल. उमेदवाराचे किमान व कमाल वय हे जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास गणण्यांत येईल.
4. **लहान कुटूंब** :- वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांस लहान कुटूंबाची अट लागु राहिल. उमेदवारांस दोन पेक्षा जास्त हयात अपत्ये (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) नसावीत. अर्जासोबत दिलेल्या नमुन्यांत लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल.
5. **मराठी भाषेचे ज्ञान** :- रिक्त पदांचा तपशिल दर्शविणा-या तक्ता **अ** मधील सर्व मदतनिस रिक्त पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.तथापि अशा उमेदवाराने इ.10 वी अथवा त्यापुढील शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहिल.
6. **उमेदवार विधवा असल्यास** :- नगर परिषद / नगर पंचायत यांचे कडील पतीचे मृत्यु प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल. पुर्नविवाह न केल्याबाबत रु100/- च्या स्टॅम्प पेपर वर स्वयंघोषणापत्र सोबत जोडणे आवश्यक राहिल.
7. **उमेदवार अनाथ असल्यास** :- संबंधित विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे अनाथ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.
8. **मागासवर्गीय उमेदवारांनी** :- सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह अर्ज करावा.

9. **अनुभव**:- मान्यता प्राप्त खाजगी व स्वयंसेवी, अनुदानित संस्थेतील कामाचा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही. व याबाबतचा कोणताही युक्तीवाद उमेदवाराने केल्यास अपात्र ठरविण्यांत येईल.
10. **एका उमेदवाराने एकच अर्ज** सादर करावा. उमेदवाराने एका पेक्षा जास्त केंद्रांच्या पदासाठी वेगवेगळे अर्ज सादर केल्यास एकच अर्ज विचारात घेण्यांत येईल. व त्याबाबतचा उमेदवाराशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
11. अर्जासोबत जन्मतारखेचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र (स्वतःचे नांवाचे), विधवा (अटी व शर्ती मधील क्रं. 6 नुसार दाखला) अनाथ महिला असल्यास(अटी व शर्ती मधील क्रं. 7 नुसार दाखला) इत्यादीच्या **सक्षम प्राधिका-या कडून साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक आहे.**जोडले नसल्यास अगर साक्षांकित नसल्यास याबाबतचे गुण दिले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याचा अतिम दिनांक 6.7.2023 नंतर **कोणत्याही प्रकारचे दस्तऐवज स्विकारले जाणार नाही**.
12. शहराचे नांव व पदाचे नांव नमुद केलेले नसणे, अर्ज अपुर्ण भरलेला असणे, खाडाखोड असणे, उमेदवाराची विहित ठिकाणी स्वाक्षरी नसणे. तसेच अर्जाच्या सोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती नसणे इत्यादी कारणांमुळे अर्ज अपात्र ठरविण्यांत येतील. व त्यासंबंधी उमेदवारास कळविण्यांत येणार नाही.
13. अंतिम दिनांकानंतर आलेल्या किंवा डाकेने (पोष्टामुळे) विलंब झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
14. **निवड कार्य पध्दती** :- महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रं.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6, दिनांक 2.2.2023 नुसार उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रावरुन 12 वी/पदवी/पदव्युत्तर/ पदविका/डि.एड./बी.एड/संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र त्यांना मिळालेल्या गुणानुसार तसेच विधवा/अनाथ/जात प्रवर्ग इत्यादीसाठी त्यांचे प्रमाणपत्रावरुन मिळालेल्या एकुण गुणांनुसार गुणानुक्रमाने पात्र उमेदवारांची शहरातील रिक्त पदांच्या संख्येनुसार निवड करण्यांत येईल. या पदांकरीता लेखी परिक्षा अथवा मुलाखत घेतली जाणार नाही. अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रानुसार शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांना गुण देवून प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यांत येईल. त्यावर अर्ज करणा-या उमेदवारांना आक्षेप /तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी 10 दिवसाच्या आंत लेखी तक्रार बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प, गडचिरोली कार्यालयाकडे सादर करावी. सदर तक्रारीची शहनिशा करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यांत यईल.
15. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनाच निकालाबाबत कळविण्यांत येईल. इतर उमेदवारांना कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
16. निवड प्रक्रीया सुरु झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांनी अर्जात किंवा अर्जा सोबत दिलेली माहिती कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती सदर प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा निवड झाल्यानंतरही रद्य करण्यांत येईल.निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्ती वेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा निवड प्रक्रीयेतून अपात्र ठरविण्यांत येईल. निवड झालेल्या उमेदवारांना सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रु.100/-चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

17. एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यांत येईल.
18. अंगणवाडी मदतनिस यांना शासन दरा नुसार दरमहा मानधन देय आहे. शासकीय नियमानुसार एकत्रित मानधनात वेळोवेळी करण्यांत आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहिल. मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते सवलती अनुज्ञेय नाही.
19. अंगणवाडी मदतनिस हे एकत्रित मानधनावरील मानधनी स्वरुपाचे पद आहे. सदर पद बढती/बदली /सेवानिृत्ती/ वेतन वाढ इत्यादी शासकीय सवलतीस पात्र नाही.
20. संबंधीत शहरातील अंतिम निवड यादी जाहिर झाल्यानंतर गुणानुक्रमे मदतनिस यांची निवड करण्यांत येईल. व गुणानुक्रमा नुसार अंगणवाडी केंद्र देण्यांत येईल. त्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांना त्या-त्या ठिकाणी कोणत्याहि अंगणवाडी केंद्रावर काम करावे लागेल. उमेदवाराची एकदा नियुक्ती झाल्यावर कोणत्याही परिस्थितीत त्यांची इतर ठिकाणी बदली करता येणार नाही. तसेच त्यांचे निवास स्थानापासून नियुक्त देण्यांत आलेल्या ठिकाणा पर्यत कोणताही प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. त्याच प्रमाणे नियुक्ती झालेल्या ठिकाणी सतत गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्ती खंडीत करण्यांत येईल. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती पुर्वी विहित नमुन्यांत करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.
21. **प्रतिक्षा यादी** :- एकुण प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची प्रतिक्षा यादी ठेवण्यांत येईल. काही कारणांमुळे उमेदवार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसात रुजु न झाल्यास किंवा त्यास अपात्र ठरविण्यांत आल्यास प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमा नुसार पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यांत येईल. व सदर क्षेत्रात कोणत्याही कारणास्तव पद रिक्त झाल्यास अथवा नविन पद निर्मीती झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारास गुणानुक्रमे नियुक्ती देण्यांत येईल. सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहिर झाल्यापासून 1 वर्ष वैध राहिल.
22. **अपील**:- मदतनिस या पदावरील घोषीत निवडी संदर्भात कोणत्याही उमेदवाराची तक्रार असल्यास निवड यादी घोषीत झाल्या पासून 30 दिवसाच्या आत विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास, नागपूर विभाग , नागपूर यांचे कडे तक्रार करावी. व मा. विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास, नागपूर विभाग , नागपूर यांनी दिलेल्या निर्णयामुळे तक्रारदाराचे समाधान झाले नसल्यास मा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे कडे पुढील 60 दिवसात अपील दाखल करता येईल.
23. **सेवा समाप्तीसाठी वयाची अट**:- या शासन निर्णयान्वये नियुक्ती होणा-या अंगणवाडी मदतनिस यांची सेवा वयाची 60 वर्ष पुर्ण होईपर्यत किंवा त्या शारिरीक दृष्टया काम करण्यांस सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तो पर्यत सुरु ठेवण्यांत येईल.
24. जाहिरातीमधील कोणत्याही मुद्याबाबत साशंकता अगर संदिग्धता निर्माण झाल्यास संबंधीत शासन निर्णयातील तरतुदी अंतिम राहतील.
25. **पत्रव्यवहार**:- भरती प्रक्रीये संबंधी अर्जदारास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही. सर्व सुचना जाहिरातीमधील अटी व शर्ती प्रमाणे असून वेळोवेळी देण्यांत येणा-या सुचना कार्यालयीन नोटीस बोर्डावर लावण्यांत येतील.
26. **महत्वाची सुचना**:- सदर भरती प्रक्रीया उपरोक्त शासन निर्णय दिनांक 2.2.2023 अन्वये राबविण्यांत येणार असून निवड व नियुक्ती गुणवत्ता यादी नुसार करण्यांत येणार आहे. करीता उमेदवारानी

कोणत्याही भुलथापांना अथवा अफवांना बळी पडू नये. तसेच कुणाशीही आर्थिक व्यवहार करु नये. कोणीही व्यक्ती नोकरी लावून देण्याच्या बहाण्याने पैश्याची मागणी करीत असल्यास तात्काळ पोलीसांना संपर्क साधावा.

27. **भरती प्रकीया वेळापत्रक**:-

1) **प्रकल्प स्तरावर अर्ज स्विकारण्याचा कालावधी**:- दिनांक 22.6.2023 ते 6.7.2023 सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून)
2) **प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे**.:- दिनांक 21.7.2023
3) **आक्षेप/ तक्रारी अर्ज सादर करण्यांचा कालावधी**:- दिनांक 21.7.2023 ते 1.8.2023
4) **अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे** :- दिनांक 2.8.2023 (आक्षेप/ तक्रारी प्राप्त न झाल्यास दिनांक 2.8.2023 ला यादी प्रसिध्द करण्यांत येईल.)

**अर्ज सादर करण्यांचा पत्ता :- बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प,गडचिरोली शासकीय संकुल परिसर, बॅरेक नं.01, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ, कॉम्प्लेक्स परिसर, गडचिरोली.**

**बाल विकास प्रकल्प अधिकारी,**
**नागरी प्रकल्प,गडचिरोली.**

# बाल विकास प्रकल्प अधिकारी,नागरी प्रकल्प, गडचिरोली

------------------------------ अंगणवाडी  मदतनीस या पदासाठी नमुना अर्ज

आ. क्र. ---------

| |
|---|
| लहान आकाराचा उमेदवाराचा अलिकडील काळातील फोटो स्वसांक्षाकिंत करुन चिटकवावा.. |

प्रति,

मा. बाल विकास प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
नागरी प्रकल्प, गडचिरोली

**विषय : ---------------------------------------येथील अंगणवाडी  मदतनीस या पदासाठी अर्ज.**

मी निम्नस्वाक्षरीता अंगणवाडी  मदतनीस या पदासाठी माझी माहिती व त्याअनुषंगाने आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र | उमेदवारानी भरावयाची माहिती | कार्यालयीन वापरासाठी |
|---|---|---|
| 1 | अ) लग्नापूर्वीचे संपुर्ण नांव: ---------------------------------------------------------------------------------<br>ब) लग्नानंतरचे संपुर्ण नांव: --------------------------------------------------------------------------------<br>नगर पंचायत/नगर परिषदेचे  नांव : ------------------------------<br>(नावात बदल असल्यास रू. 100/- चे स्टॅप पेपरवर प्रतिज्ञालेख सक्षम अधिकाऱ्याचे स्वाक्षरीने प्रमाणित करून जोडावे) | |
| 2 | जन्म दिनांक :  /  /  (10 वी प्रमाणपत्र/T C नुसार)<br>जन्म दिनांक अक्षरी- ---------------------------------------------------------------------------------------<br>दिनांक : - 20/06/2023 रोजी वय - -------------- वर्ष ------------- महिने ------------- दिवस | |
| 3 | एकुण अपत्य संख्या : ---------------- (नगर सेवक /प्रतिज्ञापत्र)<br>(उमेदवारास दोन पेक्षा जास्त अपत्य असल्यास अर्ज करता येणार नाही.) | |
| 4 | **1. विधवा / अनाथ :** ------------------------------------ **होय / नाही**<br>(असल्यास प्रमाणपत्र  - अटी व शर्ती  क्रमांक 6 व 7 मध्ये नमुद असलेले प्रमाणपत्र) | |

| 5 | **शैक्षणिक अर्हता :-** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. क्र.** | **शिक्षण** | **बोर्ड/ विद्यापीठ** | **एकुण गुण** | **प्राप्त गुण** | **टक्केवारी** |
| | 1 | 12 वी | | | | |
| | 2 | पदवीधर | | | | |
| | 3 | पदव्युत्तर | | | | |
| | 4 | डी. एड. | | | | |
| | 5 | बी. एड. | | | | |
| | 6 | MS-CIT | | | | |

6 जात : ---------------------------- पोटजात: : -----------------------------

जातीचा प्रवर्ग – (योग्य ठिकाणी √ अशी खुण करावी)

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | EWS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

मी -------------------------------------- या पदासाठी अर्ज केला असुन, संबंधित पदे भरण्यासंबंधीचा जाहीरात मी काळजीपूर्वक वाचला असून जाहीरनाम्यातील माहिती प्रमाणे वरील माहिती खरी असून त्यांचे पृष्ठयर्थ मी प्रमाणपत्राच्या स्वयंसाक्षांकीत सत्य प्रती सोबत जोडलेल्या आहेत.

वर नमूद केलेली माहिती कोणत्याही क्षणी खोटी / चुकीची आढळुन आल्यास या पदाकरिता दिलेली उमेदवारी/ निवड रद्द होईल व भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधीत कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिकाऱ्यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व यासंबंधात माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांक : / / 2023 स्वाक्षरी

ठिकाण : संपुर्ण नाव:------------------------------------------------------

मोबाईल क्रमांक :- ---------------------------------------

---

**फक्त कार्यालयीन वापरासाठी**

अर्जासोबतची प्रमाणपत्रे व त्यानुसार अर्जदाराने अर्जात भरलेली माहिती मी तपासली आहे. ती बरोबर आहे.

तपासणी सहाय्यक तपासणी प्रमुख

स्वाक्षरी स्वाक्षरी

---

(टीप: खालील माहिती कार्यालयीन कर्मचारी समोर भरावी.)

# <u>प्रतिज्ञा पत्र</u>

मी श्रीमती ------------------------------------------- -------------,

श्री/श्रीमती--------------------------------------------------- यांची मुलगी / पत्नी वय --------वर्ष

राहणार --------------------------------- याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करते की,

1) मी अंगणवाडी मदतनिस या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला खालील प्रमाणे हयात मुले / मुली आहेत.

| अ.क्रं. | अपत्याचे नांव | स्त्री / पुरुष | जन्मतारीख |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल किंवा भविष्यांत दोन पेक्षा अधिक मुले झाल्यास मानधनी पदासाठी मी अनर्ह / अपात्र ठरविण्यांस किंवा कमी करण्यांस पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

4) मला दोन पेक्षा जास्त मुले होणार नाही या साठी मी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेण्याची प्रतिज्ञा करते.

ठिकाणः-

दिनांक :- --------------------------------

उमेदवाराचे नांव व सही

# रहिवासी स्वयंघोषणापत्र

मी ---------------------------------------------------------------------------------------- श्री ---------------------------------------

---------------------------------------------------------- यांची मुलगी / पत्नी वय ------------

आधार कार्ड क्रमांक ----------------------------------------------------- राहणार -------------------------------------

ग्रामपंचायत ------------------------------------ याद्वारे घोषित करते की, मी -------------------------------- येथील स्थानिक रहिवासी असून हे गाव -

-------------------------------- या महसुली गावामध्ये समाविष्ट आहे.

वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधीत कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राव्दारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

सबब रहिवासी स्वयंघोषणापत्र देण्यात येत आहे.

स्थळ- अर्जदाराची सही-

दिनांक- अर्जदाराचे संपूर्ण नांव -----------------------------------------